Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# आदिवासी काव्यातून येणाऱ्या आदिवासीत्तर व्यक्तिरेखा - महात्मा फुले व सावित्रीबाई फुले

**श्री कमलाकर प्रकाश रगडे**
संशोधक

समाज परिवर्तनासाठी कार्य करणारे महात्मा ज्योतिबा फुले, माता सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून आयुष्यभर लढा देणारे महात्मा गांधी, कार्ल मार्क्स वर्णवादाच्या विरोधात लढा उभारून काळ्यांना न्याय मिळवून देणारे दक्षिण आफ्रिकेचे नेते नेल्सन मंडेला, फुलन देवी या सारख्या काही आदिवासी येत्तर व्यक्तीरेखावर आदिवासींनी काही कविता या लिहिल्या गेल्या आहेत. आदिवासी समाजासह संपूर्ण देशाच्या भल्यासाठी कार्य करणाऱ्या वरील महान नेत्यांप्रती आस्था असल्यामुळे आदिवासी कवितेमध्ये त्यांना स्थान मिळाले आहे.

**महात्मा ज्योतिबा फुले :**

स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करणारे व अस्पृश्यांसह मुलीसाठी पहिली शाळा स्थापन करणारे महान समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुलेंमुळे स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली. छत्रपती शिवाजी महाराजांचा पहिला पोवाडा देखील महात्मा फुलेंनी लिहिला. त्यांचे शेतकऱ्यांचा आसूड, तृतीय रत्न, ब्राम्हणाचे कसब ही पुस्तके त्यांच्या खरी राष्ट्रनिष्ठा असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देतात. शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांच्या हिताची त्यांना जाणीव होती. तत्कालीन कालखंडामध्ये असणारी अस्पृश्यता संपवावी म्हणूनही त्यांनी प्रयत्न केले. तसेच अस्पृश्यांना आपला पाण्याचा हौद खुला करून दिला होता. अशा या महान क्रांतिकारकाने आदिवासी जीवनाची आपल्या साहित्यामधून दखल घेतली होती.

“ गोंड, भिल्ल क्षेत्री होते मूळधनी/
इराणी मागनी आले येथे //
शूर भिल्ल कोळी शराने तोडीलेक/
हाकलून दिले रानीवनी //

महात्मा फुले समग्र वाङमय या पुस्तकातील वरील ओळींमधून हे स्पष्ट होते कि त्यांना येथील शोषित, वंचित घटकांची खूप काळजी होती. व ते ठामपणे त्यांनी मांडले कि गौंड, भिल्ल, कोळी या आदिवासी जमाती या येथील मूळधनी आहेत. मूळ निवासी आहेत. परंतू इराणदूत आलेल्या आर्यांनी त्यांना जंगलामध्ये ढकलून दिले. हा सच्चा इतिहास त्यांनी वाचकांसमोर आणला. आणि आदिवासींच्या दु:खी जीवनाची जणू आपल्या कवितेतून मांडणी करून त्यांच्या अंधाऱ्या घराच्या क्षितिजावर प्रथम प्रकाशाची किरणे आणली. म्हणून कवी बाबुराव डोमाजी आडे म्हणतात,

"महात्मा !
तुम्ही मित्राच्या लग्नात माणूस म्हणून तर नव्हेच
मित्र म्हणून ही उपस्थित राहू शकले नाही,
येथील अमानवीय वर्तनाच्या चिरेबंदीत,
म्हणून ! मानवतावादीचे मित्र मानवतावादीच असावेत - असू शकतात"
हे तुम्हाला आलेल्या अनुभवातून तुम्ही शिकलात"४२

महात्मा ज्योतिबा फुले यांना स्वत:ला आपल्या ब्राम्हण मित्राच्या लग्नामध्ये अपमानित व्हावे लागले होते. शुद्र म्हणून त्यानाही या व्यवस्थेने छळले होते आणि म्हणूनच अति शुद्रांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव या महापुरुषाला झाली. व त्यांच्यासाठी त्यांनी काम केले म्हणून कवी म्हणतात कि मानवतावादींचे मित्र मानवतावादी च असू शकतात. महात्मा फुले हे असेच मानवतावादी विचारसरणीचे होते. आज समाजामध्ये वाढत जाणारी अंधश्रद्धा,धार्मिक तेढ, जातीयता, हे घालवण्यासाठी कवी त्यांना पुन्हा जन्म घ्या अशी विनंती देखील या कवितेतून करतात.

समता प्रस्थापित करण्यासाठी कार्य करणाऱ्या महात्मा फुलेंच्या जन्मानंतर दोनशे वर्षाने देखील समाजात समता प्रस्थापित झाली नाही. यांचे कवीला वाईट वाटते. आजही मानवामध्ये पूर्वीची पशुता ही कायम आहे. ती नष्ट झाली पाहिजे. परंतू असे मात्र होताना दिसत नाही. महात्मा फुलेंच्या महतकार्याला आलेली फळे म्हणजेच आदिवासी कवी आणि कवयित्री, आदिवासी साहित्यिक आहेत असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. कारण त्यांनी शिक्षणाची गंगोत्री अग्निरथाप्रमाणे दलित, आदिवासी, स्त्रिया आणि बहुजनासाठी सर्वप्रथम आणली. आणि म्हणून नावारुपाला आलेल्या आदिवासी कवींच्या कवितांमधून महात्मा फुलेंच्या कार्याचा गौरव आलेला आहे. सौ. कुसुम आलम त्यांच्या संदर्भात म्हणतात.

"ज्योतिबा
पिडीताना जिवंत मरणातून
बाहेर काढण्याचा तुझा संकल्प
तूच कारावास
आणि यात्नाचे अनंत चटके
तूच सोसावेत
याचे कारण मला उमगले"

आपल्या रानआसवांचे तळे या काव्यसंग्रहातील 'ज्योतीबास' या कवितेमधून महात्मा फुलेंनी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवून, व्यवस्थेच्या विरुध्द जाऊन स्त्री- शूद्रांच्या उद्धारासाठी कार्य केले. परंतू यासाठी त्यांना खूप मोठे बलिदान द्यावे लागले. त्याग करावा लागला. अनेक यातनाचे चटके सहन करावे लागले. तरीही न डगमगता आपले कार्य अखंडपणे चालू ठेवले. आणि म्हणूनच माझे नाते इथे आज प्रकाशाशी जडले. जर तू स्त्री शिक्षणाची

बीजे रुजवली नसतीस तर आज मी अंधारात चाचपडत पडले असते अशा महात्मा फुलेंच्या अनंत उपकारासाठी आदराची भावना व्यक्त करतात. महात्मा फुले हे समग्र मानवाताजातीच्या कल्याणातून आपल्या राष्ट्राचे हित बघणारे महान नेते, समाजसुधारक होते. 'सत्यशोधक' धर्माच्या माध्यमातून एका नव्या माणुसकीच्या धर्माची निर्मिती करणाऱ्या या भारतमातेच्या सुपुत्रास मारण्यासाठी गुंडांना, मारेकऱ्याना पाठवण्यात आले. अशा माणुसकीचे दहन होत असलेल्या युगात जन्म घेवून त्यांनी पुन्हा माणुसकीला प्रज्वलित केले. आणि म्हणूनच 'रानवा' कर कवी सखाराम डाखोरेंना फुलेची आठवण होते.

'पाण्यासाठी वणवण भटकताना
तुझी आठवण आली .....
भाजी मंडईत शेतकरी लुटताना
तुझी आठवण आली .....
जीवनाचा आधार होतास तू,
गोर-गरिबांच्या .....
ज्ञानाचा दार होतास तू
दीन- दुबळ्यांच्या ........"

आपल्या 'महात्मा ज्योतिबा फुले' या कविते मधून असे दिसते कि स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे लोटली तरी येथील गोर गरीब, आदिवासी, भटके, विमुक्त, दलित यांचे प्रश्न हे अनुत्तरीत आहेत ते आजही सुटलेले नाही. आदिवासी पाड्यावरील पाण्यासाठीची भटकंती आजही संपलेली नाही. महात्मा फुलेंनी ही भटकंतीच थांबावी म्हणून स्वत:च्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला होता. खास करून दलित आदिवासीसाठी. शेतकऱ्यांच्या आसुडासारखा ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या दु:खाचे निवारण करण्याचे प्रभावी उपाय त्यातून सांगितले. इंग्रज अधिकाऱ्यांशी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी भांडले. मात्र स्वकीयांच्या राजवटीत शेतकरी आजही नागवल्या जातोय. गोर-गरीबांचा कुणीही वाली नाही. गरीब अधिक गरीब होत जातोय. तर श्रीमंत हा अधिक श्रीमंत होत जातोय हे कुठे तरी थांबले पाहिजे. व म्हणून कवींना आज मितीला जेव्हा शिक्षण व्यवस्थेचेही बाजारीकरण होतेय तेव्हा महात्मा फुलेंच्या महान कार्याची कवीला आठवण आल्यावाचून राहत नाही. महात्मा फुले बरोबरच खांद्याला खांदा लावून कार्य करणाऱ्या माता सावित्रीबाई बाई फुले संदर्भातही अनेक आदिवासी कवींनी काव्य लिहले आहे. कविता लिहिल्या आहेत.

**माता सावित्रीबाई फुले**

आद्य महिला शिक्षिका माता सावित्रीबाई फुले यांनी आपले पती महात्मा फुले यांच्या बरोबरीने त्यांच्या समाज सुधारणेच्या कार्यामध्ये सहभाग घेतला होता. त्यांचा काव्यफुले हा काव्यसंग्रह देखील प्रसिध्द आहे. सनातन्याच्या विरोधाला झुगारून महिलांना शिकवणाऱ्या त्या खऱ्या क्रांती नायिका आहेत. त्यांच्या या अद्वितीय अशा कार्याची नोंद इतिहासाने घेतली. मग

त्याला आदिवासी साहित्य तरी कसे अपवाद ठरेल. ज्ञान ज्योती, सावित्री माईच्या अजोड अशा कार्याला स्मरून कवी बाबाराव मडावी म्हणतात.

" सावित्री तू
ज्योतीबांची सावली
गरिबांची माउली
तू स्त्रियांना शिकवलस
सती जाणाऱ्याना रोखलस
विधवेला जोपासलस"

महात्मा फुलेंच्या परिवर्तनाच्या लढ्यामध्ये त्यांच्या सोबत सावलीप्रमाणे लढलेल्या भारत मातेच्या सुपुत्री असणाऱ्या सावित्री या खरोखरच गरिबांच्या माऊली होत्या. या व्यवस्थेला लाथाडून त्यांनी महिलांना शिकविण्या बरोबरच सतिप्रथेला विरोध केला. अनेक सती जाणाऱ्या महिलांना सती जाण्यापासून परावृत्त केले. त्यांना नवजीवन बहाल केले. त्यांचे संगोपन केले. दत्तक मुल यशवंताला आपला पुत्र मानले. महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतरही त्यांनी कार्य सुरूच ठेवले. प्लेगच्या साथी मध्ये अनेक रुग्णांची काळजी घेतली. अशी बहुजनांची सेवा या माउलीने केली. त्यांच्यामुळेच आज स्त्रियांच्या हाती लेखण्या मशाली आल्या. आज पुरुषांबरोबर सर्व क्षेत्रामध्ये महिला कार्यरत आहे. त्यांच्या या उपकाराची जाणीव सर्व महिलांना आजही आहे. आणि म्हणूनच आदिवासी कवयित्री कुसुम आलाम म्हणतात.

"आम्हास दुनियेच्या बरोबरीत आणताना
रुतले असतील काटेरी अगणित
तरीही प्रगतीची वाट दाखवण्यासाठी
झुंजली असशील मर्दानी सारखी
म्हणूनच आज बघतेय हा क्षण
तुझ्या कृपा प्रसादाचा
आणि प्रयत्न करतेय मीही
उतराई होण्याचा "

आजच्या महिलांना मानाचे स्थान जे मिळत आहे, बरोबरीची वागणूक जी मिळते आहे. त्यामागे सावित्रीमाईचा खूप मोठा त्याग आहे. वाटेत येणाऱ्या काट्यांना न जुमानता रणरागिणीसारखी झुंज दिली. आणि आम्हाला प्रगतीची वाट त्यामुळे दिसलेली आहे. कवयित्री म्हणतात, आज जो क्षण बघतेय त्यामागे तुझाच कृपा प्रसाद आहे. अशा सावित्रीच्या मार्गाने जाऊन ऋण फेडण्याची अभिलाषा त्यांनी व्यक्त केलेली आहे. आजच्या दुनियेच्या बरोबरीने महिला ताठ मानेने उभ्या आहेत. ते तुझ्याच अलौकिक कार्यामुळे असा आत्मीयतेचा भाव कवियत्री व्यक्त करतात.

आजच्या या युगाकडे पहात असताना त्यांना सावित्रीबाई फुले यांच्या कष्टाचे महत्व जाणवते. 'इखरलेल्या ललना' या काव्यसंग्रहाचे कवी रा.चि. जंगले यांनी आपल्या 'फुले'या कवितेमधून सावित्रीबाई फुले यांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

"तुझी ती सावित्रीबाई
बाई, का तुला ती खुणवत नाही ?
मुली शिकविल्या, खस्ता ही खाल्या
पहिली मास्तरीन बाई
बाई का तुला ती पूजवत नाही?"

कवी आजच्या महिलांना सावित्रीबाई फुले यांच्या महान अशा कार्याची जाणीव करून देतात. त्यांचे आदर्श आजही महिला का घेत नाहीत. त्यांनी सांगितलेल्या मार्गाने का चालत नाही, असा प्रश्न कवीला पडतो. त्यांनी मुलीना शिक्षण मिळावे म्हणून खूप खस्ता खाल्या. प्रस्थापितांच्या रोषाला सामोरे गेल्या. अशा पहिल्या महिला शिक्षिका म्हणून त्यांचे नाव इतिहासात सुवर्ण अक्षराने कोरले गेले आहे. अशा सावित्रीदेवीची आजच्या या महिला पूजा का करीत नाहीत. कवीच्या मते, पूजा म्हणजेच सावित्रीच्या आदर्श मार्गाने महिलांनी चालले पाहिजे. आजच्या त्यांच्या महान कार्याचा परिमल हा दरवळतो आहे. परंतू तो तुला जाणवत नाही हे तुझे अभाग्य आहे. खरे तर आजच्या महिलांना जे स्थान प्राप्त झाले किंवा होत आहे. त्याप्रमाणे सावित्रीबाईचा अगणिक अशा स्वरूपाचा त्याग आहे.

आदिवासी कवींच्या कवितांमधून सावित्रीबाई फुलेंच्या कार्याची दखल घेतल्या गेली आहे. 'अस्मितादर्श" या काव्याचे कवी वसंत कुलसंगे यांनी देखील 'ज्ञानज्योती' या कवितेमधून विद्येचे महत्व विषद केले आहे. माणसाला जीवन जगण्यासाठी शिक्षण हे खूप महत्वाचे आहे . व हेच हेरून फुले दांपत्यांनी वंचितासाठी शाळा सुरु करून गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी त्यांनी दिशा दाखवली.

संदर्भ ग्रंथ

१. पाखरं - बाबाराव मडावी
२. म्होरकी - उषाकिरण आत्राम
३. रानवा -सखाराम डाखोरे
४. ऋण मुक्ती - बापूराव डोमाजी आडे
५. रान आसवांचे तळे - सौ. कुसुम आलाम
६. इखरलेल्या ललना -रा. चि. जंगले